# सदस्य, औद्योगिक न्यायालय क्र.०२, कोल्हापुर यांचेसमोर

**तक्रार (अ. का. प्र.) क्र.१३१/२०२२.**

## निशाणी क्र. यु-०९ वरील आदेश

(दिनांक ०२ डिसेंबर, २०२४ रोजी पारीत)

**१)** अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज सादर करून न्यायालयास प्रार्थना केली की, त्यांना मयत तक्रारदार संदिप विष्णु पाटील यांचे वारसदार म्हणुन या तक्रारीत समाविष्ट करून घेण्यात यावे.

**२)** अर्जदाराने कथन केले की, तक्रारीतील मयत कामगार संदिप विष्णु पाटील हे सामनेवाले कंपनीत मेंटेनन्स या पदावरती काम करीत होते. परंतु, दिनांक ०१/१०/२०२३ रोजी ते मृत्यु पावलेले आहेत. कै. संदिप विष्णु पाटील यांचे पश्चात एकुण चार वारसदार आहेत. त्यामुळे या तक्रारीकामी अर्जदार यांना वारसदार म्हणुन सामावुन घ्यावे. अर्जासोबत नि. क्र. यु-१० वरती प्रतिज्ञापत्र सादर करून अर्जातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे शपथेवर कथन केले.

**३)** नि. क्र. सी-०४ वरती सामनेवाले यांनी म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली. सामनेवाले यांनी असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज मुदतीत नाही व अर्जामध्ये विलंबाबाबत कोणतेही कथन नाही. तसेच, तक्रारदार यांच्या जागी अर्जदार यांचा कोणता हक्क राहतो व त्याचे कारण यांचे कोणतेही कथन अर्जामध्ये नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**४)** दोन्ही विधीज्ञांचे म्हणणे ऐकुन घेतले व फैलावरील सर्व कागदपत्रे तपासुन पाहिली. तपासाअंती असे निदर्शनास आले की, मुळ तक्रार ही संदिप विष्णु पाटील या कामगाराने दिनांक ०१/१२/२०२२ रोजी दाखल केलेली होती. सदर कामामध्ये सामनेवाले हजर होऊन त्यांचे लेखी निवेदन निशाणी क्र. सी-०३ वरती दाखल केले. त्यानंतर न्यायालयाने दिनांक ०७/१०/२०२३ रोजी वादाचे मुद्ये निश्चित केले. परंतु, मुळ तक्रारदार संदिप विष्णु पाटील हे दिनांक ०१/१०/२०२३ रोजी मयत पावले. मृत्युचा दाखला नि. क्र. यु-११ सोबत दाखल आहे. तो दाखला पाहिला असता आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १८/१०/२०२३ रोजी जारी केला असल्याचे दिसुन येते. तसेच, नि. क्र. यु-११ सोबत तिन्ही अर्जदारांच्या आधार कार्डाच्या छायांकीत प्रती दाखल केलेल्या आहेत. यामुळे सकृतदर्शनी असे दिसुन येते की, सदरील अर्जदार हे मयत कामगार कै. संदिप विष्णु पाटील यांचे वारसदार आहेत.

**५)** प्रस्तुत तक्रारीमधील नि. क्र. यु-०२ वरती न्यायालयाने आदेश पारीत केलेले असुन सामनेवाले यांना असे आदेशीत करण्यात आले होते की, त्यांनी रक्कम रूपये २,१६,७७६/- (दोन लाख सोळा हजार सातशे शहात्तर रूपये फक्त) या न्यायालयात जमा करावे. तसेच, सदरील प्रकरणामध्ये कोणाचीही साक्ष झालेली नाही. त्यामुळे अर्जदारांना या तक्रारीमध्ये समाविष्ट करणे संयुक्तिक ठरेल. तसे केलेस सामनेवाले यांचे कोणतेही नुकसान होणार नसुन उलटपक्षी अर्जदार

तथा वारसदार यांचे नुकसान होणार आहे. सबब, हे न्यायालय खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) नि. क्र. यु-०९ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार तथा त्यांचे विधीज्ञ यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मुळ तक्रारीमध्ये अर्जदार यांची नांवे समाविष्ट करून दुरूस्ती प्रत पुढील तारखेस दाखल करावी.

३) खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**सही/-.**
(श्री. एस. डी. सुर्यवंशी)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय क्र.०२, कोल्हापुर.

**कोल्हापुर.**
दिनांक :- ०२/१२/२०२४.